
ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 6 | FEBRUARY - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# नाथाजी लाड यांचे स्वातंत्र्य चळवळीतील कार्य: एक दृष्टिक्षेप



विवेकानंद राजाराम माने
इतिहास विभागप्रमुख,
क्रांतिअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालय, कुंडल जि. सांगली.

## प्रस्तावना :

भारतीय स्वातंत्र्य चळवळीला दैदिप्यमान इतिहास आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या लढ्यात १९४२ चे ‘चलेजाव आंदोलन’ स्वातंत्र्य चळवळीतील महत्त्वाचे पर्व आहे. क्रिप्स योजना फेटाळली गेल्यानंतर वर्धा येथे कॉंग्रेस वर्किंग कमिटीची बैठक झाली आणि ७ व ८ ऑगस्ट १९४२ रोजी गवालिया टॅकवर कॉंग्रेस अधिवेशन भरले. या अधिवेशनात छोडो भारतचा ठराव जवाहरलाल नेहरुंनी मांडला. त्यावेळी म. गांधीनी केलेल्या भाषणात ‘करेंगे या मरेंगे’ चा नारा दिला. लोकांच्यात जागृती निर्माण झाली, परंतु दुसऱ्याच दिवशी राष्ट्रीय कॉंग्रेसच्या महत्त्वाच्या सर्व पुढाऱ्यांना अटक झाली. त्याची प्रतिक्रिया संपूर्ण भारतभर उमटली.

सातारा जिल्ह्यातील नाना पाटलांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांनी भूमिगत होवून कार्य करण्याचे ठरविले. क्रांतिसिंहांच्या नेतृत्वाखाली प्रतिसरकार चळवळीचे कार्य ब्रिटनच्या पार्लमेंटने नोंद घ्यावी इतके महत्त्वपूर्ण ठरले होते. क्रांतिसिंह नाना पाटील हे १९४२ च्या क्रांतिलढ्यातील झुंजार सेनानी म्हणून ओळखले जातात. क्रांतिसिंहांचे एकूण जीवन आणि कार्य विचारात घेतल्यास ब्रिटिश आमदनीत सातारा प्रतिसरकारचे संस्थापक म्हणून त्यांच्या कार्याचे महत्त्व जितके आहे, तितकेच त्यांच्या अगोदरच्या आणि नंतरच्या कार्याचेही आहे. त्यांचे नेतृत्व हे बहुजनांचे तसेच समाजसुधारणेच्या चळवळीतून उभे राहीले होते. स्वातंत्र्य संग्रामातील संयुक्त सातारा जिल्ह्याने प्रतिसरकार स्थापन करताना हुतात्म्यांनी, क्रांतिसिंहांनी, क्रातिवीरांनी, स्वातंत्र्यसेनानी, स्वातंत्र्य सैनिकांनी जिवावर उदार होऊन केलेल्या विविध प्रसंगांचा प्रेरणादायी इतिहास आहे. यामध्ये क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी, क्रांतिअग्रणी जी. डी. (बापू) लाड, रामचंद्र श्रीपती लाड, बर्डे मास्तर, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, नाथाजी लाड, धोंडीराम माळी, लीलावती पाटील, हौसाताई पाटील, इंदूताई पाटणकर, राजुताई बिरनाळे इत्यादी देशभक्त आहेत. त्यातील एक नाथाजी बाबूराव लाड त्यांच्या स्वातंत्र्याच्या योगदानावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधामध्ये संशोधकाने केलेला आहे.

सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यातील (पूर्वीचा तासगाव) कुंडल या गावात एका शेतकरी कुटूंबात २ ऑगस्ट १९२२ रोजी नाथाजी बाबुराव लाड यांचा जन्म झाला. घरची परिस्थिती गरीबीची होती. त्यांचे प्राथमिक व सातवी पर्यंतचे इंग्रजी शिक्षण कुंडल येथेच झाले.[१] परंतु गरीबीमुळे नाथाजी लाड यांना पुढील शिक्षण पूर्ण करता आले नाही. ते १९३३ मध्ये किर्लोस्कर मासिकाच्या छापखान्यात नोकरीस लागले. किर्लोस्करवाडीतील किर्लोस्कर मासिकाच्या कार्यालयात कामगार म्हणून काम करतानाच त्यांनी कामगार मंडळ स्थापन केले होते. त्यांचे नेतृत्व गुण तिथे दिसू लागले होते. सुप्रसिध्द कवी ग. दि. माडगुळकर हे त्यांचे वर्गमित्र होते.[२] कुंडल येथे ते रात्रशाळा चालवत. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या

भगिनी गंगुबाईशी त्यांचा विवाह कोणत्याही प्रकारचा हुंडा न घेता एकमेकांना सुताचे हार घालून अगदी साधेपणाने सागरेश्वर येथे झाला. 'गांधी विवाह' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या विवाहाची कल्पना क्रांतिसिंहाची, ती त्यांनी नाथाजी लाडांच्या विवाहापासून अंमलात आणली.[३]

कुंडलच्या परिसरात स्वातंत्र्य चळवळीचे वारे वेगाने वाहू लागले होते. यावेळी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रेरणेने नाथाजी लाड यांनी स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतली आणि गावात तिरंगा फडकवत फेऱ्या काढल्या. त्यांनी स्थापन केलेल्या कामगार मंडळाच्या सहाय्याने 'करेंगे या मरेंगे' असा मंत्र जपत ब्रिटीश सत्ता खिळखिळी करण्याचा निर्धार केला होता. क्रांतिलढ्यातील त्यांचे सहकारी त्यांनी 'सुरेशबाबू' या टोपणनावाने ओळखत असत. ८ व ९ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईच्या गवालिया टॅंक आझाद मैदान येथे कॉग्रेसने अधिवेशन झाले. या अधिवेशनास पूर्वीच्या सातारा जिल्ह्यातून बरेच कार्यकर्ते गेले होते. कृष्णा वारणेच्या परिसरातून क्रांतिसिंह नाना पाटील, वसंतदादा पाटील, पांडूमास्तर, आप्पाजी बर्डे, बाबुराव चरणकर, गणपत पाटील इत्यादी तेथे जमलेल्या कार्यकर्त्यावर पोलिसांनी लाठीमार करून अश्रुधुराचा वर्षाव केला. हजारो कार्यकर्ते पकडले गेले, यावेळी अनेकांनी पोलीसांचा डोळा चुकवून आपापल्या गावी जाऊन भूमिगत राहून लढा पुढे चालू ठेवण्याचा निर्धार केला. ३ सप्टेंबर १९४२ च्या इतिहास प्रसिध्द असा तासगांव मध्ये विराट मोर्चा निघाला होता. तासगांवच्या मोर्चाने तालुका मॅजिस्ट्रेट व तालुका मामलेदार यांना गांधी टोपी घालायला लावून, त्यांच्याच हस्ते तिरंगा झेंडा कचेरीवर फडकवला. यावेळी हा मोर्चा यशस्वी झाला. या मोर्चामध्ये नाथाजी लाड यांचा सिंहाचा वाटा होता. तासगांव मोर्चानंतर ब्रिटीश सरकारने दडपशाहीचे धोरण स्विकारल्यामुळे क्रांतिसिंह नाना पाटील, नाथाजी लाड इत्यादी नेते भूमिगत राहून कार्य करू लागले.[४]

ब्रिटीश सत्तेविरूध्द लढण्यासाठी स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलभूत गरजा म्हणजे शस्त्रे व पैसा. त्या गरजा भागविण्यासाठी नेहमी काहीतरी उपाययोजना भूमिगत नेत्यांना आखणे व त्या पार पाडणे क्रमप्राप्त होते. अशीच अभिनव योजना जी. डी. बापू लाड व नागनाथ अण्णांनी क्रांतिसिंह नाना पाटलांसमोर मांडली, ती म्हणजे पे स्पेशल ट्रेन लुटणे. क्रांतिसिंहानी याला तत्काळ मान्यता दिली. दर महिन्याच्या ७ तारखेला मिरजेपासून पुण्यापर्यंत एक गाडी केवळ नोकरांचा पगार वाटत जात असे. ही पे स्पेशल ट्रेन ७ जून १९४३ यादिवशी शेणोली खिंडीत लुटण्याचे ठरले. ताकारी स्टेशन आणि शेणोली स्टेशन या दोन स्टेशनच्या मध्यावरती खिंड आहे. तेथील चढणाला गाडीच्या पुढे दगडाचा ढीग रचण्यात आला व पे ट्रेन लुटण्यात आली. या लुटीत एकूण १९ हजार ७१६ रूपये मिळाले. पगाराची गाडी लुटणे, शेणोली स्टेशन व डाक बंगली जाळणे, वारणा ते नीरे पर्यंत २०० टेलीफोन खांब पाडून एका रात्रीत तार तोडणे इत्यादी धाडसी कामांचे नियोजन जी. डी. बापू लाड, नागनाथ अण्णा, अण्णा धनगर, आप्पा लाड, नाथाजी लाड, रामा तेली, एस. पी. पाटील, ज्ञानू चौकिवाले, रामू तात्या, रावसाहेब कळके, बंडू लाड, एस. पी. जाधव यांनी केले होते.[५]

जुलमी ब्रिटीश सरकारच्या गोळीबारामुळे भाई कोतवाल ३० डिसेंबर १९४२ ला हुतात्मा झाले. त्यांच्या प्रथम वर्ष श्राध्दाच्या दिवशी नाथाजी लाड व त्यांच्या सहकाऱ्यांनी पुणे, मुंबईची लाईट एक रात्रीत बंद करून त्यांना खरी श्रध्दांजली वाहिली. त्यावेळी नाथाजी लाड जनतेला 'देशासाठी एक दिवस संप' असे आवाहन करत असत.[६]

१९४२ च्या 'चले जाव' च्या लढ्यानंतर सातारा जिल्ह्यात ऐतिहासिक स्वरूपाचे प्रतिसरकार उभे राहिले हे प्रतिसरकार छोट्या — मोठ्या अठरा गटात विभागले होते. या चळवळीत जीवावर उदार होऊन हत्यारे घेऊन उठलेले पाचशेच्यावर क्रांतिकारक संघटित झाले होते. या लढ्यात अनेकजण हुतात्मे झाले. नाथाजी लाड यांनी प्रतिसरकार चळवळीत अत्यंत महत्वाची भूमिका बजावली. धुळे खजिना लुटीसह अनेक योजनांच्या आखणीत नाथाजी लाड यांचा सहभाग होता. शेणोली पगाराची ट्रेन लुटण्यात त्यांचा पुढाकार होता. त्यांच्या भुमिगत हालचालींनी हैराण झालेल्या ब्रिटीश पोलीसांनी त्यांच्यासाठी पाच हजारांचे इनाम ठेवले होते.[७] मात्र ते कधीही पोलीसांच्या हाती लागले नाहीत.

प्रतिसरकार चळवळीत नाथाजींनी क्रांतिसिंहाना सुरक्षित ठेवणे, सर्व कार्यकर्त्यांशी संपर्क ठेवणे ही कार्ये त्यांनी अत्यंत उत्तम रितीने पार पाडली. माझे काही बरेवाईट झाले तर एकट्या सुरेशबाबूस सांगा व माझा देह पुरुन टाका असे क्रांतिसिंह म्हणत असत. यावरुन नाथाजी लाड यांच्या कार्याचे महत्व कळते.

तसेच ते क्रांतिसिंहांच्या हजारोंच्या संख्येने लोक उपस्थित असलेल्या सभा कौशल्याने पार पाडत असत. त्यासाठी त्यांना लक्ष्मण तांबटकाका, गंगाधर चिटणीस, गोविंदराव मिरजे, पांडुरंग देशपांडे यांची मदत मिळाली होती.[८] नाथाजी लाड यांनी स्वत:चे लग्न क्रांतिसिंहाची बहीण गंगुबाई यांच्याशी साधेपणाने करून जनतेला आदर्श घालून दिला. सर्वसामान्य जनतेमधील नवरा बायको यांची भांडणे मिटवणे, नवऱ्यांना बायकोला नांदवण्याला भाग पाडणे, ही कामे प्रतिसरकारांमार्फत केली जात. सावकार व गुंडामार्फत होणाऱ्या त्रासाचा बंदोबस्त प्रतिसरकारचे नेते करत असत. त्यातही नाथाजी लाड आघाडीवर असत. ३ ऑगस्ट १९४३ रोजी चले जाव स्वातंत्र्यलढ्याच्या काळातील २०० भूमिगत क्रांतिकारकांची सभा पणुंब्रे, ता. शिराळा येथे झाली. त्यासभेत नाथाजी लाड यांची प्रतिसरकारच्या डिक्टेटरपदी सर्वाधिकारी म्हणून एकमताने निवड झाली.[९] धाडसी स्वभाव, कुशाग्र बुध्दी, नियोजनबध्द काम हे गुण असणाऱ्या नाथाजी लाड यांनी ही निवड सार्थ ठरवली.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राज्याच्या राजकारणात जाण्याची संधी त्यांना होती. मात्र त्यांनी सत्तेची हाव न धरता तन—मन व धनाने स्वत:ला शैक्षणिक व सामाजिक कार्याला वाहून घेतले. स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी सांगली हीच आपली कर्मभूमि मानली. लोकशिक्षण मंडळ या शैक्षणिक संस्थेची स्थापना करुन रात्रशाळा, महाराष्ट्र रेसिडेन्सियल स्कूल सांगली येथे तर हिंदकेसरी मारुती माने हायस्कूल, कवठेपिरान येथे सुरु केले. अशा या महान क्रांतिकारकाचा मृत्यु ७ डिसेंबर २००३ रोजी झाला.

## निष्कर्ष :

तत्कालीन सातारा जिल्ह्यात अनेक क्रांतिकारी व धाडसाची कामे नाथाजी लाड यांनी पार पाडली. त्यांच्या भुमिगत हालचालींनी हैराण झालेल्या ब्रिटीश पोलिसांनी त्यांच्यासाठी पाच हजारांचे इनाम ठेवले होते. यावरुन त्यांच्या कार्याचे महत्व लक्षात येते. माझे काही बरेवाईट झाले तर एकट्या सुरेशबाबूस सांगा व माझा देह पुरुन टाका असे क्रांतिसिंह म्हणत असत यावरुन क्रांतिसिंहांचा त्यांच्यावरील असलेला विश्वास समजतो. शेणोली पे स्पेशल ट्रेन लूट, धुळे खजिना लूट यामध्ये त्यांचा सक्रीय सहभाग होता. स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी सत्तेत न जाता स्वत:ला शैक्षणिक व सामाजिक कार्याला वाहून घेतले यावरुन त्यांच्या निस्वार्थ स्वभावाचे दर्शन घडते.

## संदर्भ:


१) पाटील डी. बी., असे लढले क्रांतिवीर नाथाजी लाड, प्रयत्न प्रकाशन, सांगली, डिसेंबर २००७,पृ. ३
२) कित्ता पृ. ४
३) सहस्त्रबुद्धे चिंतामणी, सांगलीच्या पाऊलखुणा, सकाळ पेपर्स लिमिटेड, कोल्हापूर, २००५, पृ. १३२
४) लाड. जी. डी., पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य, क्रांतीअग्रणी जी. डी. बापू लाड समाजप्रबोधन संस्था, कुंडल, २००५, पृ. ३७
५) धर्माधिकारी भालचंद्र, क्रांतिवीर, क्रांतिवीर नागनाथ नायकवडी गौरव समिती, वाळवा, २००७,पृ १४
६) पाटील डी. बी., उपरोक्त पृ. १४
७) सहस्त्रबुद्धे चिंतामणी, उपरोक्त पृ. १३
८) पवार जयसिंगराव संपा., क्रांतिसिंह नाना पाटील, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर, २००३, पृ १०१
९) गुरव बाबुराव, भारतीय स्वातंत्र्यचळवळ : लोकविद्रोहाचा धगधगता अंगार, निर्मिती विचारमंच, कोल्हापूर २००८, पृ. ११५